पोलीस आयुक्तालय, पिंपरीचिंचवड
पोलीस उपआयुक्त(गुन्हे)
ई मेल– dcphq.pcpc-mh@gov.in

प्रेस नोट दि.२९.०७.२०२४

## पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा, युनिट-३ ची कामगिरी

## आंबेठाण येथील एकतर्फी प्रेमातुन झालेल्या मुलीचे खुनाचे गुन्हयातील आरोपीस निष्पन्न करुन १२ तासात अटक

दिनांक २८/०७/२०२४ रोजी रात्रौ २३.१५ वा. क्राईम कंट्रोल कडुन प्राप्त संदेशा प्रमाणे म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे हददीत आंबेठाण येथे एका मुलीच्या गळयावर चाकुने वार करुन खुन झालेला आहे सदर मुलगी जागीच मरण पावली आहे अशी माहीती मिळाली असता सदर ठिकाणी वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड व गुन्हे शाखा युनिट ३ कडील पोलीस स्टाफ असे तात्काळ घटनास्थळी भेट दिली सदर ठिकाणी फिर्यादी यांची मैत्रिण नामे प्राची विजय माने वय २१ वर्षे मुळगाव उरुण इस्लामपुर ता.वाळवा जि.सांगली सध्या रा.आंबेठाण ता.खेड जि.पुणे हीस एकतर्फी प्रेमातुन इसमनामे अविराज खरात रा. बहे ता.वाळवा जि.पुणे यास प्राची हीने लग्नास नकार दिल्याचे कारणावरुन त्याने चिडुन जावून चाकुने तिचे गळयावर व पोटावर वार करुन तिचा निघृण खुन करुन पळुन गेला होता तसेच यातील मयत प्राची हीचा मोबाईल देखील त्याने पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने सोबत घेवून गेला होता. सदर बाबत म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे गु.र.नं.४७७/२०२४ भा.न्याय.संहीता.कलम १०३ (१), ३५१(३) प्रमाणे गुन्हा दाखल आहे

सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने आमचे व सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ३ कडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक, शैलेश गायकवाड, पोहवा/७५५ आढारी, पोहवा/४७९ सानप, पोहवा/१४५६ भोसुरे, पोशि/१९४० हनमंते, पोशि/२८८३ काळे, पोशि/२७१८ सुर्यवंशी, पोशि/२२९६ जैनक, पोशि/२३९९ बाळसराफ अश्या तपास पथकाच्या दोन टिम तयार करुन सदर आरोपीचे वर्णन व ताब्यातील पल्सर मोटर सायकल यांचे वर्णना वरुन सदर आरोपींचे शोध घेणेकरीता एक तपास टिम आरोपीचे मुळगावी सांगली येथे व एक टिम आरोपीचा माग काढत घटनास्थळावरील व आजुबाजुचे सीसीटीव्ही चेक करुन तसेच तांत्रिक विश्लेषणात्मक तपास करुन सदर आरोपींचा शोध घेत असताना सदर आरोपी हा सातारा ते कराड रोडवर त्याचेकडील पल्सर मोटर सायकल नंबर एमएच १० ईएफ ४१५४ या वरुन प्रवास करीत असले बाबत माहीती मिळताच सदर दोन्ही तपास पथकांनी सातारा ते कराड महामार्ग एनएच ४ यावरती सापाळा रचुन १० ते १५ किलोमीटर आरोपीचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेत असताना त्याने मोटर सायकल न थांबविता मोटर सायकलसह पुढे पळ काढण्याचा प्रयत्न करीत असताना पथकातील अंमलदारांनी जिवाची परवा न करता शिताफिने आरोपी नामे अविराज रामचंद्र खरात रा. बहे ता.वाळवा जि.पुणे यास ताब्यात घेवून त्याचेकडुन एकुण तीन मोबाईल व एक पल्सर मोटर सायकलसह ताब्यात घेवून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर आरोपीस व गुन्हयातील मुददेमाल पुढील कारवाईकामी म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे.

अशाप्रकारे आरोपी बाबत काही एक सुगावा नसताना गुन्हे शाखा युनिट ३ पिंपरी चिंचवड कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण समांतर तपास करुन व माहीती काढण्यासाठी पारंपारीक पध्दतीचा कौशल्यपुर्ण वापर करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त, श्री.विनय कुमार चौबे, मा.पोलीस सह आयुक्त, श्री.शशिकांत महावरकर, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदिप डोईफोडे, सहा पोलीस आयुक्त (गुन्हे)डॉ. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस अंमलदार- यदु आढारी, सचिन मोरे, विठठल सानप, ऋषीकेश भोसुरे,सागर जैनक, राजकुमार हनमंते,रामदास मेरगळ, योगेश्वर कोळेकर, त्रिनयन बाळसराफ, सुधिर दांगट, समीर काळे,शशिकांत नांगरे, राहुल सुर्यवंशी, तांत्रिक विश्लेषक नागेश माळी यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे )
पोलीस उपआयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड